महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ९७ वा दिनांक : ११/०१/२०२५ वार : शनिवार

## देवेंद्र फडणवीस यांनी नरेंद्र मोदींचे वारसदार व्हावे : विजय वडेट्टीवार



**चंद्रपूर** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्ही सुद्धा आता नरेंद्र मोदींचे वारसदार व्हावे, असे विधान कांग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. कर्मवीर मारोतराव कन्नमवार यांची १२५ वी जयंती चंद्रपूर येथे साजरी करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. मात्र, या कार्यक्रमात भाजप नेते सुधीर मुनगंटीवार उपस्थित नव्हते. त्यांच्या अनुपस्थितीमुळे वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत.

कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले, खरे तर त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय वारसदार म्हणून आम्ही कर्मवीर मारोतराव कन्नमवार यांच्याकडे पहायचो आणि ते नंतर मुख्यमंत्री देखील झाले. आता आम्ही तुमच्याकडे कर्तुत्व आहे, कार्य करण्याची क्षमता आणि हिंमत आहे. त्यामुळे आता तुम्ही सुद्धा नरेंद्र मोदी यांचे वारसदार व्हावे. स्वाभाविक आहे. त्यात काही वेगळे नाही, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

पुढे बोलताना विजय वडेट्टीवार यांनी भाजप आमदार किशोर जोरगेवार यांना देखील टोला लगावला आहे. ते म्हणाले, किशोर जोरगेवार यांनी या दोन्ही जिल्ह्यांच्या विकासासाठी जो प्रस्ताव मांडला त्याला मी अनुमोदनही देतो. खरे तर तुम्ही बाजूची खुर्ची घेण्यात फार पटाईत आहात. राजकारणात हे कौशल्य, काही गोष्टी ज्युनियरकडून सीनियरला शिकावे लागते. ते मी किशोर जोरगेवार यांच्याकडून येथे आल्यापासून शिकलो, अशी टोलेबाजी विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते. यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले, मला माहीत आहे की चंद्रपूर हा जिल्हा वाघ आणि 'वारां'चा आहे. सुधीर मुनगंटीवार हे आमचे नेते आहेत, तसेच विजय वडेट्टीवार आणि किशोर जोरगेवार हे आमचे मित्र आहेत. त्यामुळे मी सांगतो की कुठलेही 'वार' असले तरी आम्ही त्यांचा सन्मान करतो. कारण आम्ही हेडगेवारांचे अनुयायी आहोत. त्यामुळे 'वार' हे आडनाव आल्याबरोबर आमचे हात नेहमी पुढे असतात, असे विधान देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

## पंढरपूर कॉरिडॉर विकास प्रकल्पाला अमोल मिटकरींचा विरोध

**पंढरपूर** : पंढरपूर कॉरिडॉर विकास प्रकल्प राज्य सरकारतर्फे करण्यात येणार आहे. मात्र या प्रकल्पाला महायुती सरकारमधील घटकपक्षांमध्ये मतभेद असल्याचे समोर आले आहे. पंढरपूर विकास प्रकल्पाला राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. हा प्रकल्प करताना होळकर वाडा, शिंदे सरकार वाडा, नामदेव पायरी यांच्यासह अनेक मंदिरांना पाडावे लागणार असल्याने याला अमोल मिटकरी यांनी विरोध केला आहे.

अमोल मिटकरी म्हणाले, पंढरपुरातील ऐतिहासिक आणि धार्मिक वास्तूंना हात न लागतं विकास होणार असेल तर आपली त्याला हरकत नसेल. मात्र, पंढरपूरमधील वारकऱ्यांची आस्था असलेल्या इंचभर दगडालाही हात लागला तर आम्ही ते सहन करणार नाही, असा इशारा अमोल मिटकरी यांनी दिला आहे.

पुढे बोलताना अमोल मिटकरी म्हणाले, पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्प करताना होळकर वाडा, शिंदे सरकार वाडा, नामदेव पायरी यांच्यासह अनेक मंदिरांना पाडावे लागणार आहे. ही गोष्ट वारकऱ्यांच्या आस्थेची असल्याने आपला त्याला विरोध आहे. काशी, उज्जैन आणि वाराणसीच्या धर्तीवर पंढरपूरचा विकास करण्याचा सरकारचे धोरण आहे. मात्र, पंढरपूर या देवस्थानांपेक्षा सर्वार्थाने वेगळे असल्याने येथील विकासाची तुलना पंढरपूरशी करता येणार नाही.

## विधानसभेत आम्ही महाविकास आघाडी धुवून काढली : देवेंद्र फडणवीस

**नागपूर** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका कार्यक्रमात मुलाखत देताना अनेक विषयांवर भाष्य केले. लोकसभा निवडणुकीत आम्ही ओव्हर कॉन्फिडंसमध्ये होतो आणि महाविकास आघाडी देखील होती. मात्र विधानसभा निवडणुकीत आम्ही महाविकास आघाडीचा फेक नरेटीव्हचा फुगा एका मिनिटांत फोडला आणि पूर्ण महाविकास आघाडी धुवून काढली, असा टोला फडणवीस यांनी यावेळी बोलताना लगावला. तसेच शरद पवारांनी संघाचे कौतुक केले त्यावर देखील देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही ठरवले होते की सगळ्या चर्चा करून सरकार तयार करू. त्यामुळे जरा कालावधी लागला. यात कधी एकनाथ शिंदे नाराज, कधी अजित पवार नाराज. आता माध्यमांना देखील दोष देता येत नाही, त्यामुळे बातमी मिळाली तर ठीक नाहीतर काहीतरी बनवावी लागते. कधी कधी आम्ही लोक बातम्या तयार करतो. पण मला असे वाटत नाही की त्यात फार काही अटी शर्ती टाकल्या आणि शिंदे साहेबांनी ते तात्काळ स्वीकारले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, शिंदे साहेबांच्या समोर तोच प्रश्न होता की मुख्यमंत्री होतो आणि आता उपमुख्यमंत्री व्हावे की नाही. त्यामुळे मी त्यांना माझा अनुभव सांगितला, मी म्हंटले की तुम्हाला पक्ष चालवायचा आहे. माझा पक्ष तर असा आहे की अनेक नेते आहेत, दिल्लीत वरिष्ठ आहेत. पण तुमचा पक्ष हा तुमच्या एका खांबावर उभा आहे. विभाजन झाल्यानंतर चांगले यश मिळालेला तुमचा पक्ष आहे त्यामुळे तुम्ही सरकारमध्ये आले पाहिजे. आता तुम्ही माझे चेहऱ्यावर नेहमी हास्य पाहिले असेल, पण त्यांचा चेहरा असा आहे की त्यांच्या चेहऱ्यावर फारसे हास्य नसते. पण ते मुख्यमंत्री असताना देखील त्यांचा तसा चेहरा होता पण तेव्हा कोणी बोलले नाही. आणि आता उपमुख्यमंत्री झाल्यावर बघा शिंदे साहेब हसतच नाहीत, असा एक समज तयार झाला.

महाराष्ट्रात आपण पाहिले आहे की एक संस्कृती आहे. दक्षिणेत पाहिले तर तिथे दोन पक्षाचे नेते एकमेकांशी बोलत नाहीत. तसे इथे नाही. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर माझे पहिल्याच भाषणात सांगितले की मला महाराष्ट्राची राजकीय परंपरा परत आणायची आहे. मला बदल घडवणारे राजकारण करायचे आहे बदला घेण्याचे नाही. मला असे वाटते की त्याला प्रतिसाद सगळ्याच नेत्यांनी दिला. त्यामुळे सगळ्या पक्षाचे नेते एकमेकांना भेटत आहेत.

शरद पवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कौतुक केले होते, त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीत ज्यावेळी एक फेक नरेटीव्ह तयार करण्यात महाराष्ट्रात यश आले तेव्हा महाविकास आघाडीला ओव्हरकॉन्फिडन्स आला की आम्ही ही निवडणूक आता जिंकू. आमच्यासाठी तो एक धक्का होता. तेव्हा माझ्यासह सगळेच ओव्हरकॉन्फिडन्समध्ये होतो. कारण आम्हाला असे वाटले की या फेक नरेटीव्हचा जनतेवर काही परिणाम होणार नाही, त्यांनी जे व्होट जिहाद चालू केले होते त्याचा परिणाम होणार नाही असे आम्हाला वाटले होते. पण दुर्दैवाने त्याचा परिणाम झालेला बघितला आणि महाराष्ट्राच्या निवडणुका देखील जवळ आल्या होत्या. तेव्हा आम्ही विचार संघाला सांगितले की राजकारणात तुम्ही काम करत नाही, पण सध्या जे अराजकतावादी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याच्या विरोधात आपल्याला राष्ट्रीयशक्तींच्या विचारांनी उतरण्याची गरज आहे. मला असे वाटते की राष्ट्रीय विचाराच्या ज्या शक्ती आहेत याचा मूळ परिवार हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आहे. तसेच विविध क्षेत्रातील लोकांनी एकत्र येत अराजकतावादी शक्तीच्या विरोधात राष्ट्रीयशक्ती निर्माण करण्याचे योगदान दिले. त्यामुळे जो फेक नरेटीव्हचा मोठा फुगा जो तयार झाला होता, तो एका टाचणीने फोडण्यात आला आणि विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी पूर्णपणे धुवून निघाली. शरद पवार अतिशय चाणाक्ष आहेत. त्यांनी निश्चितपणे याचा विचार केला असेल की आम्ही एवढे मोठे तयार केलेले वायु मंडल हे एका मिनिटात पंक्चर झाले, हे कसे शक्य झाले? यामागे अदृश्य शक्ती कोण आणि त्यांना लक्षात आले की ही शक्ती जी आहे ही नियमित राजकारण करणारी शक्ती नाही, हे राष्ट्रकारण करणारी शक्ती आहे. त्यातून मग त्यांनी प्रतिस्पर्ध्याचे कौतुक करावे तसे कौतुक केले असावे.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, २०१९ पासून माझ्या विधानांमध्ये बदल झाला आहे. २०१९ ते २०२४ या काळात जे काही घडले त्यातून मी एक गोष्ट शिकलो ती म्हणजे 'नेव्हर से नेव्हर'. ही गोष्ट होणार नाही असे म्हणून चालायचेच नाही. राजकारणात काहीही होऊ शकते. म्हणजे ते झालेच पाहिजे असे नाही. उद्धव ठाकरे तिकडे जातात, अजित पवार इकडे येतात, त्यामुळे काहीही होऊ शकते. त्यामुळे राजकारणात काय होईल हे सांगता येत नाही आणि होणारही नाही असे म्हणून चालत नाही.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ जानेवारी २०२५


## वादविवाद स्पर्धेत बलसुर येथील श्री छत्रपती शिवाजी उच्चमाध्यमिक विद्यालयाचा संघ ठरला अव्वल





**उमरगा/मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** सामाजिक प्रश्नांच्या मुळापर्यंत जावून उत्तरे शाधायची असतील तर वैचारिक वादविवाद आवश्यक आहे असे प्रतिपादन भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अमोल मोरे यांनी केले. ते काल श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भारत शिक्षण संस्थेचे संस्थापक चिटणीस शिक्षणमहर्षी तात्यारावजी मोरे यांच्या स्मरणार्थ आयोजित शिक्षणमहर्षी तात्यारावजी मोरे आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते.

या प्रसंगी मा. पद्माकररावजी हराळकर, डॉ. सुभाष वाघमोडे, मा. अशोकराव पाटील, मा. रामराव इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती.निजामी राजवटीमध्ये मराठवाड्यातील ग्रामीण भागात शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणारे शिक्षणमहर्षी तात्यारावजी मोरे यांच्या शैक्षणिक कार्याला उजाळा मिळावा आणि विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व आणि नेतृत्व गुण विकसित व्हावेत यासाठी विविध सामाजिक विषयावर विचारमंथन घडवून आणण्याच्या हेतूने या आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले जाते.

यावर्षीच्या चाळिसाव्या वर्षातील स्पर्धेसाठी "वर्गातील वाढती अनुपस्थिती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मारक आहे/नाही" या ज्वलंत विषयावर आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत सोलापूर, धाराशिव, लातूर आणि बीड या चार जिल्ह्यातील संघांनी आपला सहभाग नोंदविला.

या स्पर्धेत बलसुर येथील श्री छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खुडे दिव्या व कोकाटे यशोदा यांच्या संघाने प्रथम पारितोषिक रुपये दहा हजार एक, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र तर लोहारा येथील भानुदासराव चव्हाण वरिष्ठ महाविद्यालयातील बादुले सानिका व गिल्डा संजीवनी यांच्या संघाने सांघिक द्वितीय पारितोषिक रुपये सात हजार एक व प्रमाणपत्र पटकाविले.

तर निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या वाडकर गीता यांना वैयक्तिक तीन हजार रुपयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अमोल भैय्या मोरे, सहचिटणीस डॉ. सुभाष वाघमोडे, प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. सुधीर मठपती, डॉ. रवींद्र आळंगे, प्रा. परमेश्वर सूर्यवंशी आणि डॉ. सुभाष इंगळे यांनी काम पाहिले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, प्रभारी प्राध्यापक वसंत हिस्सल, उपप्राचार्य जी. एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, संयोजन समितीचे प्रमुख डॉ. विनोद देवरकर, डॉ. चंद्रसेन करे, डॉ. सन्मुख मुच्छट्टे, डॉ. व्ही. एम. गायकवाड, प्रा. अनंत कसगीकर, प्रा. शेखर दाडगे, प्रा.महेश माकणिकर, प्रा. एम. डी. साळुंके, डॉ. प्रवीण जवळगेकर, प्रा. बी. व्ही. मोरे, आणि प्रा. एस बी कल्हाळीकर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रदीप पाटील यांनी तर डॉ. विनोद देवरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## महापुरुषांचे विचार आपल्या भविष्यासाठी प्रेरणादायी - तहसीलदार विद्याचरण कडवकर




**कन्नड(अरुण थोरात):** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयात चार दिवसीय जिजामाता महोत्सवास उत्साहात सुरुवात झाली आहे.

जिजामाता महोत्सवाचे यंदाचे 22 वे वर्ष असून यावेळी उद्घाटक म्हणून कन्नडचे तहसीलदार विद्याचरण कडवकर यांची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी शिक्षक विद्यार्थी व पालक मेळाव्याचे ही आयोजन करण्यात आले होते. उपस्थित विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना तहसीलदार विद्याचरण कडवकर साहेब म्हणाले की आपण महापुरुषांच्या विचारांचे पाईक बनणे हे आपल्या भविष्यासाठी प्रेरणादायी असणार आहे.

कार्यक्रमाचे संयोजक तथा जिजामाता परिवाराचे सचिव सागर जाधव यांच्या पुढाकाराने शाळेचे गुणवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर यात प्रा.मनोज मोकासे, कैलास आमले, डॉ. संजय गायकवाड, साईदास राठोड, सचिन निकम, संजय जाधव, मिनाक्षी शिंदे, संकेत मांदाडे, सोनाली मोरे, चैताली जाधव, सचिन लोखंडे, नितीन मुरकुंडे या सत्कारमूर्तींचा तहसीलदार कडवकर, प्राचार्य विजय भोसले, सागर जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी तेजराव निळ, केंद्रप्रमुख बाजीराव ताठे, शिवनारायण जैस्वाल, प्रा.योगिराज सोमवंशी, सतीश शर्मा, प्रशांत जालनापुरकर यांची उपस्थिती होती, रवींद्र पाटील, अनिल एडके रवींद्र यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश जंजाळ तर आभार प्रदर्शन सचिन भामरे यांनी केले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रदीप भोकन, दीपक जाधव, जगमोहन मुंडवाडकर, ज्ञानेश्वर नायकुडे, दत्तात्रय गायके, लक्ष्मण पांडव, भगवान म्हैसमाळे, योगेश कुमावत, सुरज हिरे, सुनीता दापके, सुनीता बाविस्कर, सीमा राठोड, रिना काळे, सुभाष जाधव, संतोष आग्रे यांनी सहकार्य केले






## स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालयात सामूहिक वाचन व ग्रंथप्रदर्शन संपन्न




**दाभाडी ता. कन्नड(प्रकाश खेत्री)** : १० जानेवारी, २०२५ रोजी दाभाडी येथील स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालयात "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या शासनाच्या उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन व ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि नवीन ग्रंथांची ओळख करून देणे हा होता. ग्रंथालयाच्या माध्यमातून ग्रामीण समाजामध्ये वाचन संस्कृती व वृद्धिंगत व्हावी, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील पुस्तकांचे एक तास सामूहिक वाचन केले. त्यानंतर नव्याने खरेदी केलेल्या ग्रंथांचे वाचन साहित्य प्रदर्शन भरवण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसह जिल्हा परिषद शिक्षिका महाले मॅडम व जाधव मॅडम उपस्थित होत्या.

कार्यक्रमाला गावचे सरपंच मुक्तार शहा, उपसरपंच मधुकर आदीक, श्री. गणेश पगारे, व श्री. सदाशिव लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले सर यांनी या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांना वाचनाचा सराव व नवीन ग्रंथांची ओळख यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे सदस्य आणि गावकऱ्यांनी सहकार्य केले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे वाचनसंस्कृती वृद्धिंगत होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ जानेवारी २०२५

## डॉ. (सौ.) इं. भा. पाठक महिला महाविद्यालयात वाचन पंधरवडा उत्साहात साजरा




छत्रपती संभाजीनगर:- येथील डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात मराठी, संस्कृत, हिंदी व इंग्रजी भाषा विषय, ग्रंथालय आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शन, सामुहिक वाचन, वाचक संवाद इत्यादी उपक्रमातून वाचन संस्कृती विद्यार्थिनींमध्ये रूजावी या हेतूने "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या अंतर्गत १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत दिनांक १ ते १५ जानेवारी दरम्यान ग्रंथ प्रदर्शन, सामुहिक वाचन, ग्रंथ परीक्षण असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत शासकीय विभागीय ग्रंथालयाचे जिल्हा अधिकारी श्री. सुनील हुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथ वाचन संवादाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई, ग्रंथपाल प्रा. ज्योत्स्ना जावळे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. अन्विता अग्रवाल, डॉ. मीनाक्षी देव-निमकर, डॉ. रमा दुधमांडे, डॉ. शोभा हनवते-शिंदे, डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा. रवींद्र परभाणे, डॉ. गजानन सर्वज्ञ, डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी, प्रा. सुचित्रा कुलकर्णी यांच्या सहकार्याने महाविद्यालयात वाचन पंधरवडा सुरू आहे.

## डॉ.रामलिंग पुराणे उमरगा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण..

### तहसीलदार यांच्या लेखी आश्वसनानंतर उपोषण माघे...



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील सामाजिक कार्यकर्ते तथा बसव प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ.रामलिंग पुराणे यांनी दि.१० जानेवारी पासून शेतकरी,होमगार्ड, जुनी पेन्शन योजना विषयाचे विविध मागण्या घेऊन उमरगा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण आंदोलन छेडला होता. शेतकऱ्यांना शेत रस्ता, हमीभाव, भूसंपादन केलेल्या जमिनीचा मावेजा पूर्णपणे भेटला का याची चौकशी, पाणंद रस्ता, शेतकरी माहिती मदत केंद्र, आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबला आर्थिक मदत, होमगार्डना ३६५ दिवस काम, कायद्यात बदल, १९८२ जुनी पेन्शन योजना लागू करणे बाबतच्या मागण्या घेऊन दि.१० वार शुक्रवार रोजी धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण आंदोलन छेडण्यात आला होता.

या आंदोलनास शेतकरी, मराठवाडा विकास प्रतिष्ठाण, मराठा सेवा संघ सह विविध सामाजिक संघटनेचा पाठिंबा व समर्थन मिळाला. तहसीलदार गोविंद येरमे यांच्या लेखी आश्वसनानंतर उपोषण माघे घेण्यात आला. यावेळी गोविंद येरमे यांनी तहसील अंतर्गत येणाऱ्या कामाची तात्काळ दखल घेऊन त्यावर कारवाई करण्यात येईल व त्याच बरोबर शासन दरबारी असणाऱ्या विषया संदर्भात पाठपुरावा करू असे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण माघे घेण्यात आले. यावेळी सुजित शेळके, सिद्धेश्वर भालेराव, श्रीकांत बेंडकाळे, प्रकाश इंगोले, श्रीधर इंगळे, सुनील खंडागळे,डिंगबर सोनटक्के, प्रकाश इंगोले, महादेव मेनसे, शिवपुत्र सोलापूरे, बिराजदार, राजू स्वामी,राचय्या स्वामी,मनोज खंडागळे, महेंद्र कांबळे, मल्लिनाथ जेऊरे, मल्लय्या स्वामी आदीसह शेतकरी बांधव बहूसंख्येने उपस्थित होते.




## जे. ई. एस. महाविद्यालयात भौतिकशास्त्र संशोधन परिषदेचे उद्घाटन



### जालना जिल्ह्यात भारतीय ज्ञान परंपरेचा यथोचित वापर करून जालना जिल्हा हा आत्मनिर्भर व्हावा — डॉ. कमल टावरी

**जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे) :** जालना जिल्हयात भारतीय ज्ञान परंपरेचा यथोचित वापर करून जालना जिल्हा हा आत्मनिर्भर भारत, जैवविविधता, ग्रामस्वराज्य तसेच पर्यावरण पूरक योजनांसाठी देशात रोल मॉडेल झाला पाहिजे असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातर्फे आयोजित संशोधन परिषद उद्‌घाटन प्रसंगी भारत सरकारचे निवृत्त सचिव डॉ.कमल टावरी यांनी केले.

जेईएस महाविद्यालय जालनाच्या भौतिकशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन दि. १० व ११ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी अध्यक्ष जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया हे होते प्रमुख उद्‌घाटक म्हणून भारत सरकारचे निवृत्त सचिव डॉ.कमल टावरी होते प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे निवृत्त भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी के बीचिले होते तसेच विद्यापीठ व्यवस्थापन सदस्य डॉ.गजानन सानप व डॉ. अंकुश कदम सोसायटीचे सचिव श्री श्रीनिवास भक्कड होते. व्यासपीठावर जेईएस एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्री फुलचंद भक्कड तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री संशोधन परिषदेचे संयोजक प्रा. डॉ.सुशांत देशमुख आदींची उपस्थिती होती.

भौतिकशास्त्र संशोधन परिषद आयोजना मागील भूमिका, नवीन संशोधक तयार करणे असून, त्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असल्याचेही प्रयत्नशील असल्याचेही प्रा. डॉ. सुशांत देशमुख यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्राचा

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ जानेवारी २०२५


# तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश




**खुलताबाद :** येथील श्री घृष्णेश्वर विद्यालयात दि. ०६/०१/२०२५ रोजी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आद्य संस्थापक कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ ढाकेफळकर यांच्या ३८ व्या पुण्यस्मरण निमित्त आयोजित खुलताबाद तालुकास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) वेरूळ चा विद्यार्थी चि. कार्तिक किसन बुरकुल वर्ग ८ वी यांने तालुकास्तरीय स्पर्धेतून प्रथम क्रमांक पटकावला याबद्दल त्यास स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम २०००/ रुपये बक्षीस देण्यात आले. तसेच माध्यमिक गटातून चि.अर्जुन संतोष ठाले वर्ग १० वी याने द्वितीय क्रमांक पटकावला याबद्दल त्यास स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र व २०००/रोख रक्कम देण्यात आली.

मिळालेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा अध्यात्म शिरोमणी श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज तसेच संस्थेचे सचिव महंत १०८ सेवागिरीजी महाराज, अविर्मुक्तेश्वरनंदजी महाराज, शालेय विकास समितीचे अध्यक्ष श्री अंकुश जाधव गुरुजी, संस्थेचे प्रशासनाधिकारी श्री काकासाहेब गोरे तसेच संस्थेचे विविध पदाधिकारी व विद्यालयाचे प्राचार्य श्री बोरसे व्ही.यु. पर्यवेक्षक तथा जेष्ठ शिक्षक श्री अधाने गुरुजी यांनी यश संपादन करणारे विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले.

# प्रा. बाळासाहेब बोरसे यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार प्रदान



**नाशिक :** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनानिमित्त नाशिक येथे ५ जानेवारी रोजी राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यात संभाजीनगरातील म.शि.प्र. मंडळाच्या देवगिरी महाविद्यालयाचे मराठीचे सेवानिवृत्त सहयोगी प्रा. बाळासाहेब बोरसे यांचा त्यांची शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना सदर पुरस्कार भाजपचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी आणि उत्तर महाराष्ट्र सौंदर्य सम्राज्ञी निशिगंधा कापडणीस या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे हे होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# उद्धव सेनेला छत्रपती संभाजी नगरात धक्का : मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी केला शिंदे सेनेत प्रवेश



**छत्रपती संभाजीनगर :** मध्ये ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसला आहे. ठाकरे गटाचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे उद्धव सेना गटाला मोठा धक्का बसला आहे.

आठवडाभरापूर्वी माजी महापौर नंदकुमार घोडले यांनी शिंदे गटात प्रवेश केला असतानाच, आता आणखी एक मोठा नेता शिंदे गटाच्या गळाला लागला आहे. त्यामुळे ठाकरे गटाला आणखी एक धक्का समजला जात आहे. शिवसेनेमध्ये फोडाफोडी मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. त्याचा प्रत्यय पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे.

एकीकडे उद्धव सेनेचे नगरसेवक सोडून जाण्याच्या तयारीत असताना उद्धव ठाकरे यांनी नगरसेवकांना भेटून त्यांची पडझड रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र या बैठकांचा परिणाम दिसण्या अगोदर हा प्रवेश करण्यात आला आहे. त्यामुळे शिवसेनेसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे आगामी काळात आणखीन मोठ्या प्रमाणात शिवसेनेचे प्रवेश एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत होणार असल्याचा दावा संजय शिरसाठ यांनी केला आहे

शिरसाठ म्हणाले की, उद्धव सेनेत आता कुठल्याही भवितव्य नाही आमचे चाळीस वरून ६० आमदार झाले तर त्यांच्या आमदारांची संख्या वीस वर आली आहे त्यामुळे आता अधिकाऱ्यांना कुठलाही भवितव्य नसल्याची टीका त्यांनी केली. त्यामुळे उद्धव ठाकरे आता केवळ पदाधिकाऱ्यांना भेटी देत आहेत मात्र यापूर्वी त्यांनी कधीही नगरसेवकांना भेट दिल्या जात नव्हत्या.आता पदाधिकारी सोडून जात असल्यामुळे त्यांना यांची आठवण आली असल्याची टीका शिरसाठ यांनी केली.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, माजी महापौर नंदकुमार घोडेले,गजानन बारवाल,विकास जैन,उपशहर प्रमुख सतीश निकम,मोहित त्रिवेदी उपस्थित होते.

# सुरक्षितता बाळगण्यात आहे 'हिरोगिरी' - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छत्रपती संभाजीनगर :** वेगमर्यादेचे उल्लंघन करुन स्टंट करण्यात हिरोगिरी नसून; सुरक्षितता बाळगून वाहने चालविण्यात खरी हिरोगिरी आहे, अशा शब्दांत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी युवक युवतींना रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले.

रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चा प्रारंभ आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात रस्ते सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, महामार्ग सुरक्षा पथकाच्या पोलीस अधीक्षक रुपाली दरेकर, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड, राज्य परिवहन महामंडळ विभाग नियंत्रक सचिन क्षीरसागर, पोलीस उपायुक्त वाहतुक शिलवंत नांदेडकर, अधीक्षक अभियंता एस.एस. भगत, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. शशिकांत ढिकले आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, सुरक्षा केवळ रस्त्यावरच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आवश्यक आहे. समन्वय,सतर्कता आणि संयम अंगी बाळगला की सुरक्षित जीवनाचे समाधान लाभते. रस्ते सुरक्षिततेसाठी वाहनांची देखभाल दुरुस्ती वेळेवर करणे, वाहतुक नियमांचे पालन, व्यसनमुक्त राहण्याने आपला व आपल्यासोबत इतरांचाही प्रवास सुरक्षित होतो. 'वाहनाचे स्टेअरिंग हे डेअरिंग दाखविण्याची जागा नाही', याचे भान वाहन चालवितांना असले पाहिजे. अपघात कमी करण्याचा संकल्प यानिमित्ताने सगळ्यांनी करावा. रस्त्यावर सुरक्षितता बाळगण्यात हिरोगिरी आहे, असे आवाहन त्यांनी केले.

*प्रत्येक अपघात टाळता येतो- डॉ. विनयकुमार राठोड*

प्रत्येक अपघात हा थोड्याशा खबरदारीने, काळजीने, उपाययोजनांनी टाळता येऊ शकतो. केवळ हलगर्जीपणा, अतिआत्मविश्वास, अनाठायी धाडस यामुळेच अपघात होत असतात. प्रत्येकाने खबरदारी बाळगली तर प्रत्येक अपघात टाळता येऊ शकतो,असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी केले.

प्रास्ताविकात विजय काठोळे म्हणाले की, आपल्या जिल्ह्यात गेल्या वर्षभरात 670 मृत्यू हे रस्ते अपघातात झाले आहेत. हे सर्व मृत्यू आपण टाळू शकलो असतो. केवळ हेल्मेट न वापरल्याने त्यातील अनेक मृत्यू झाले आहेत. 'परवाह अर्थात केअर', असे या वर्षीच्या अभियानाचे ब्रीद वाक्य आहे,असे त्यांनी सांगितले. रुपाली दरेकर, डॉ. देशमुख यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माहिती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले तसेच प्रबोधनपर चित्रफितींचे प्रदर्शनही करण्यात आले. सविता पवार यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी युवक युवतींची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.